# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०१/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा शिवापूर ता. भिवापूर येथे दिनांक ३०/०१/२०२२ चे २३.०० वा. ते दिनांक ३१/०१/२०२२ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अमोल धनराजजी वासेकर, वय ३६ वर्ष, रा. भिवापुर यांचे घराचे दाराचे अज्ञात आरोपीने कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लोखंडी आलमारी मधील लॉकर मध्ये ठेवलेले प्लास्टीक चे डब्यात ठेवलेले सोने—चांदीचे दागीने व सोनाटा घडी कि. ५०० तसेच नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. १,२८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पांडे हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील मौजा सालईधाबा शिवार येथे दिनांक २८/०१/२०२२ चे ००.०० वा. ते दिनांक २९/०१/२०२२ चे ००.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पांडुरंग राजेभाऊ लष्कर, वय २५ वर्ष, रा. वृंदावन सोसायटी गुमगाव त. हिंगणा जि. नागपूर यांचे सालईधाबा साईडवर ठेवलेल्या सेन्ट्रींगच्या लहान मोठया ९३ प्लेटा कि. ३०,०००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार इकबाल शेख ९९२३७४०२४० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ४ कि. मी. अंतरावरील फुकट नगर कांद्री नाल्याजवळ कन्हान येथे दिनांक ३०/०१/२०२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संतोष इद्रसेन यादव, वय ३६ वर्ष, रा. खदान नं ३ मडीबाबा कन्हान हे आपले स्टाफसह वेकोली परिसरात पेट्रोलिंग करित असतांना यातील आरोपी क्र. १) अब्दुल फारूख अब्दुला शेख, वय २५ वर्ष, रा. फुकट नगर कांद्री, २) सागर राजु यादव वय ३० वर्ष, रा. फुकट नगर कांद्री व ३) अभिषेक उर्फ चिंटु बब्लु सिंग वय २४ वर्ष, रा. खदान नं. ६ कन्हान यांनी वेकोली कामठी उपक्षेत्र येथुन कोळसा चोरून कांद्री फुकट नगर नाल्याजवळ ठेवलेला कोळसाचा ढिगार हे ट्रक मध्ये भरून वजन करून ८ टन ६० किलो चोरीचा कोळसा एकुण कि. ४०,३००/—रू. चा कोळसा कामठी ओसीएम येथे जमा करून कोळसाची चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो.न. ९२८४२६२५९६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**